सहायक कक्ष अधिकारी (मर्यादित) विभागीय परीक्षा-2016

परीक्षेचा दि. 27 नोव्हेंबर, 2016

पेपर क्र.- 1

**A**

2016

CODE : OO8

प्रश्नपुस्तिका

प्रश्नपुस्तिका क्रमांक

BOOKLET NO.

पेपर I

# मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, शासकीय योजना व शासनाशी संबंधित बाबी

वेळ : 1 (एक) तास

एकूण प्रश्न : 100

एकूण गुण : 100

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या शेवटच्या पानावर पहा

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

1. 'मला दोन रुपये हवे होते' - या विधानातील काळ ओळखा.

   (1) भूतकाळ (2) वर्तमानकाळ (3) भविष्यकाळ (4) रीतिकाळ

2. पुढील वाक्प्रचाराचा अनुक्रमे **योग्य** अर्थ सांगा ?

   'काणाडोळा करणे, खसखस पिकणे, ग्वाही देणे'

   (1) मोठ्याने हसणे, साक्ष देणे, लक्ष न देणे (2) साक्ष देणे, लक्ष न देणे, मोठ्याने हसणे

   (3) लक्ष न देणे, मोठ्याने हसणे, साक्ष देणे (4) मोठ्याने हसणे, लक्ष न देणे, साक्ष देणे

3. मराठी शब्द आणि त्याचे मूळ रूप यांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| (अ) टिकला | (i) शलाका |
| (ब) ठाण | (ii) तिलक |
| (क) वाकळ | (iii) स्थान |
| (ड) सळई | (iv) वल्कल |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (2) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| (3) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (4) | (ii) | (iii) | (iv) | (i) |

4. 'अश्विनीने वर्गातील उपस्थित मुली मोजल्या पण त्या दहाच भरल्या'. वाक्य प्रकार ओळखा.

   (1) मिश्रवाक्य (2) संयुक्तवाक्य (3) केवलवाक्य (4) उद्‌गारार्थीवाक्य

5. धातुसाधित विशेषणे ओळखा :

   (1) गारहवा, आंबट द्राक्षे, हुशार मुले, धूर्त माणूस.

   (2) वाहणारी नदी, उडणारी पाखरे, खेळणारी मुले.

   (3) दहा विद्यार्थी, चार गुण, पुष्कळ लोक, पंच पक्वान्न

   (4) गणपतीची मिरवणूक, मंत्र्यांचे भाषण, अळूची वडी.

6. 'होकार, प्रतिकार, उपहार, जनता' हे अनुक्रमे कोणत्या प्रकारचे शब्द आहेत ? ते ओळखा.

   (1) उपसर्गघटित, साधित, साधित, सिद्ध (2) साधित, साधित, उपसर्गघटित, प्रत्ययघटित

   (3) सिद्ध, साधित, उपसर्गघटित, प्रत्ययघटित (4) प्रत्ययघटित, साधित, साधित, उपसर्गघटित

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

7. जोड्या जुळवा.

(अ) कन्नड शब्द — (i) दलाल, शेट, डबा

(ब) देशी शब्द — (ii) अदालत, कंदील, कुळूप

(क) अरबी शब्द — (iii) ओगराळे, येळकोट, भीड

(ड) गुजराती शब्द — (iv) काकवी, आघाडा, कोकरु

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (2) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (3) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (4) | (i) | (ii) | (iv) | (iii) |

8. 'ओहो' या शब्दाची जात ओळखा.

(1) क्रियाविशेषण (2) शब्दयोगी (3) केवलप्रयोगी (4) उभयान्वयी

9. 'जुन्या आठवणींनी माझे डोळे पाणावले' – हे वाक्य कोणत्या क्रियापद प्रकारातील आहे ?

(1) सकर्मक क्रियापद (2) संयुक्त क्रियापद (3) साधित क्रियापद (4) प्रयोजक क्रियापद

10. पुढीलपैकी व्याकरणदृष्ट्या **योग्य** असलेला शब्द ओळखा.

(1) दुर्देवी (2) दुर्दैवी (3) दूर्दैवी (4) दूदैवी

11. 'दरबारी मान, विड्याचे पान' म्हणीचा अर्थ ओळखा.

(1) दरबारात मान मिळविण्यासाठी पान खाऊन जाणे.

(2) दरबारात ज्याला मान असतो त्यालाच पान मिळते.

(3) दरबारात मान-पान देण्याचे नाटक करणे, प्रत्यक्षात मात्र तसे काहीच नसणे.

(4) नित्यनेमाने विड्याची पाने खाणाऱ्याला दरबारात मान-सन्मान मिळतो.

12. जोड्या जुळवा.

(अ) पासंगाला न पुरणे — (i) सोंग ढोंग करून फसविणे

(ब) ढंगधत्तूरा दाखविणे — (ii) पराजय कबूल करणे

(क) घोड्यावर बसून येणे — (iii) थोडी सुद्धा शिल्लक नसणे

(ड) दाती तृण धरणे — (iv) खूप घाई करणे

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (2) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (3) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| (4) | (ii) | (iii) | (i) | (iv) |

13. 'ई-आख्यात' हा कोणत्या काळाशी वा अर्थाशी निगडित आहे ?
(1) भविष्यकाळ (2) रीतीभूत काळ (3) विध्यर्थ (4) संकेतार्थ

14. 'माझे वडील आज परगावी गेले.' हे कोणत्या वाक्य प्रकाराचे उदाहरण आहे ?
(1) प्रश्नार्थी वाक्य (2) होकारार्थी वाक्य (3) विधानार्थी वाक्य (4) उद्‌गारार्थी वाक्य

15. व्याकरणदृष्ट्या **योग्य** असलेला शब्द ओळखा.
(अ) सुटी (ब) सुट्टी
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (अ) बरोबर (2) फक्त (ब) बरोबर
(3) (अ), (ब) दोन्ही चूक (4) (अ), (ब) दोन्ही बरोबर

16. शाब्दिक **चुका** असलेली वाक्ये ओळखा.
(अ) रमेश त्याच्या घरी गेला. (ब) रमेश आपल्या घरी गेला.
(क) सुलभा आपल्या नवऱ्याशी रोज भांडते. (ड) सुलभा तिच्या नवऱ्याशी रोज भांडते.
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (अ), (क) बरोबर (2) फक्त (अ), (ब) बरोबर
(3) फक्त (ब), (ड) बरोबर (4) फक्त (ब), (क) बरोबर

17. पुढील इंग्रजी पारिभाषिक शब्दाचे मराठीतील अनुक्रमे पारिभाषिक शब्द ओळखा.
'कॅशियर, ऑनररी, मोट्टो'
(1) ब्रीदवाक्य, रोखपाल, मानद (2) रोखपाल, ब्रीदवाक्य, मानद
(3) रोखपाल, मानद, ब्रीदवाक्य (4) मानद, रोखपाल, ब्रीदवाक्य

18. 'हात ओला तर मित्र भला' या म्हणीच्या अर्थाला समानार्थी असणारी म्हण ओळखा :
(1) रंगलेल्या तोंडाचे मुके घेणे. (2) हात फिरे तिथे लक्ष्मी वसे.
(3) असतील शीते तर जमतील भूते. (4) हिरा तो हिरा गार ती गार.

19. पुढील वाक्यात कोणता प्रयोग आहे ? ते ओळखा.
(अ) त्या घरात आम्ही संसार मांडला. (ब) मुलांनी उत्तम काम केले.
(क) शिक्षकांनी कविता छान शिकवली. (ड) त्याने दोन घोडे व एक बैल विकत घेतला.
**पर्यायी उत्तरे :**
(1) (अ) आणि (ब) कर्तरी प्रयोग, बाकी भावे प्रयोग
(2) (क) आणि (ड) भावे प्रयोग अन्य कर्मकर्तरी प्रयोग
(3) (अ), (ब), (क), (ड) हे सर्व कर्मणी प्रयोग
(4) (अ), (ब), (क), (ड) हे सर्व कर्तरी प्रयोग

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

20. शुद्धलेखनाच्या नियमानुसार **योग्य** नियम निवडा.

(अ) ज्या अक्षराचा उच्चार नाकातून स्पष्टपणे होतो; त्या अक्षरावर अनुस्वार द्यावा.

(ब) स्पष्टोच्चारित अनुनासिका बद्दल शीर्षबिंदू द्यावा.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) योग्य (2) फक्त (ब) योग्य

(3) (अ) व (ब) दोन्ही योग्य (4) (अ) व (ब) दोन्ही चूक

---

**पुढील उतारा वाचून प्र. क्र. 21 ते प्र. क्र. 25 ची उत्तरे लिहा.**

ज्या दिवशी आपण अस्पृश्यतेला घटनेत मूठमाती दिली, स्त्रियांना मताधिकार दिला, अल्पसंख्याकांना नागरिकत्वाचे सर्व अधिकार दिले, त्या दिवशी सामाजिक क्रांतीचे नवे पर्व सुरू झाले. आपण कामगारांना न्याय देणारे अनेक कायदे केले, त्या दिवशी आपल्या आर्थिक न्याय देणाऱ्या उद्दिष्टांची पूर्ती करण्यास आपण प्रारंभ केला. जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, सामूहिक विकास केंद्र यांच्याद्वारे ग्रामीण क्रांतीची पायाभरणी केली. विज्ञानाचा अभ्यास करणाऱ्या प्रयोगशाळा काढल्या, नवे, अवजड उद्योगाचे कारखाने निघाले. देश संरक्षणक्षम करण्यासाठी संरक्षक साधनांचे कारखाने सुरू केले. ही सगळी भारतातील नव्या वैज्ञानिक युगाची नांदी होती, पण दुर्दैव असे आहे की, परदेशात घडलेल्या क्रांतीच्या उदाहरणांनी आम्ही इतके भारावून गेले होतो की, आम्ही आमच्या देशात सुरू केलेली क्रांती यशस्वी होण्यासाठी, ती राबवण्यासाठी पुरेसा उत्साह दाखवला नाही. याचा अर्थ गेल्या 20 वर्षांत घडले, ते सारे बरोबर होते, चुकाच झालेल्या नाहीत, असे मुळीच नाही. पण आज दिसणारे वैफल्य हे केवळ आपल्या अपेक्षाभंगातून निर्माण झालेले नसून जे सभोवताली घडते आहे, ते आपण नीट समजावून न घेतल्यामुळे आले आहे. त्यामुळे परिस्थिती अगदी निराशाजनक वाटते आणि समाजात दोषदर्शी प्रवृत्तीच वाढत जातात. एखादी योजना आपण आखतो, ती पार पाडू लागतो, त्या वेळी तिच्या सामाजिक, आर्थिक परिणामांची समग्र जाणीव अनेकदा आपल्यास होत नाही. जसजसे आपण त्या मार्गाने जातो, तसतसे आपणास नवे प्रश्न दिसू लागतात. उदाहरणच द्यावयाचे झाले, तर शिक्षणाचे देता येईल. शिक्षणाचा अनिर्बंध प्रसार व्हावा, अशा मताचा मी होतो, आणि आजही आहे. शेकडो वर्षे निरक्षरतेच्या, अज्ञानाच्या अंधकारात चाचपडणाऱ्या भारताला विज्ञानाचा प्रकाश लवकर दिसावा, ही त्यामागची तळमळ होती. पण ही विज्ञानाची कवाडे उघडली, प्रकाश आला आणि त्यामुळे नवा, तंत्रज्ञांचा वर्ग निर्माण झाला. पण त्यातूनच बेकार तंत्रज्ञांची व शिक्षितांची समस्या आज आपल्यापुढे उभी आहे. एखाद्या वर्गाला पुढचे भवितव्य स्पष्ट दिसले नाही की, तो अस्वस्थ होतो. काहीतरी नवा मार्ग शोधतो.

---

21. सामाजिक क्रांतीचे नवे पर्व सुरू झाले ज्यादिवशी :

(अ) अस्पृश्यतेला घटनेत मूठमाती दिली.

(ब) स्त्रियांना मताधिकार दिला.

(क) अल्पसंख्याकांना नागरिकत्वाचे सर्व अधिकार दिले.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) आणि (क) योग्य पर्याय (2) फक्त (ब) आणि (क) योग्य पर्याय

(3) (अ), (ब) आणि (क) योग्य पर्याय (4) फक्त (क) योग्य पर्याय

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**22.** शिक्षणाच्या प्रसारामागे कोणती तळमळ होती ?

(अ) वैज्ञानिक प्रगती व्हावी

(ब) निरक्षरता आणि अज्ञान दूर व्हावे

(क) बेकार तंत्रज्ञ व शिक्षितांची समस्या निर्माण व्हावी

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) आणि (ब) बरोबर (2) फक्त (ब) आणि (क) बरोबर

(3) फक्त (अ) आणि (क) बरोबर (4) सर्व पर्याय बरोबर

---

**23.** वरील उताऱ्याला **योग्य** शीर्षक द्या.

(1) क्रांतीचे नवे पर्व (2) क्रांतीचा पाया

(3) वैज्ञानिक प्रगती (4) अस्वस्थतेतून नवा मार्ग

---

**24.** कोणती घटना भारतातील नव्या वैज्ञानिक युगाची नांदी ठरली ?

(अ) विज्ञानाचा अभ्यास करणाऱ्या प्रयोगशाळा

(ब) नवे, अवजड उद्योगाचे कारखाने

(क) संरक्षक साधनांचे कारखाने

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) आणि (क) बरोबर (2) फक्त (अ) आणि (ब) बरोबर

(3) फक्त (ब) आणि (क) बरोबर (4) (अ), (ब) आणि (क) तिन्ही बरोबर

---

**25.** लेखकाच्या मते वैफल्य कशामुळे आले आहे ?

(अ) नव्या वैज्ञानिक युगामुळे

(ब) सामाजिक क्रांतीच्या नव्या पर्वामुळे

(क) क्रांतीच्या यशस्वीतेतील निरुत्साहामुळे

(ड) सभोवतालची परिस्थिती नीट न समजावून घेतल्यामुळे

**पर्यायी उत्तरे :**

(1) वरील सर्व पर्याय बरोबर (2) केवळ (अ) आणि (ब) बरोबर

(3) केवळ (ब) आणि (क) बरोबर (4) केवळ (ड) बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

26. Match the pairs :

| | (I) | | (II) |
|---|---|---|---|
| (a) | A squirrel's home | (i) | Archives |
| (b) | A residence of nuns | (ii) | Monastery |
| (c) | A residence for monks | (iii) | Dery |
| (d) | A place where government records are kept | (iv) | Convent |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iv) | (iii) | (i) |
| (2) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| (3) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (4) | (iv) | (iii) | (i) | (ii) |

27. (a) Shakespeare says : Do wrong to none.
(b) Tennyson says, "Knowledge comes, but wisdom lingers."
(c) O, dear ! come to me like lightening.

Identify the sentence/s punctuated incorrectly.

(1) Only (a) (2) Only (a) and (c)
(3) Only (b) (4) Only (c)

28. Which of the following expressions are **correct** ?
(a) Turn in one's grave.
(b) Fill one's own grave.
(c) Have one foot in the grave.

**Answer options :**

(1) (a) and (b) only (2) (b) and (c) only (3) (a) and (c) only (4) (a), (b) and (c)

29. Choose the word/s with **correct** spelling/s.
(a) HARRASS (b) EMBARRAS (c) LIEUTENANT

**Answer options :**

(1) (a) only (2) (c) only (3) (b) and (c) only (4) (a), (b) and (c)

30. (a) The scenery of the countryside is very charming.
(b) He is going to United States.
(c) I bought two pairs of shoes.

Identify the **incorrect** sentence/s.

(1) Only (a) and (c) (2) Only (b)
(3) Only (c) (4) None of the above

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

31. Which of the following sentences is/are **not** correct ?
(a) That pair of scissors belong to me.
(b) The furnitures are to be delivered today.
(c) A pair of shoes were standing in the corner.
**Answer options :**
(1) (a) only (2) (a) and (b) only (3) (a) and (c) only (4) (a), (b) and (c)

32. Fill in the blank from the given options.
"The United States ________ highly advanced in science and technology."
(1) is (2) are (3) were (4) have been

33. A small table was lying ________ the two almirahs.
Fill in the blank choosing the **correct** option from below.
(1) among (2) between (3) in (4) at

34. Sonali said, "I must go home."
Choose the **correct** indirect narration of the sentence.
(a) Sonali said that she had to go home.
(b) Sonali said that she must go home.
**Answer options :**
(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

35. Some of the discoveries of modern science are simply <u>marvellous</u> .
Identify the **correct** meaning of the underlined word.
(1) praiseworthy (2) commendable (3) admirable (4) amazing

36. Find out the **correct** sentence/s :
(a) I have lost a ten-rupees note. (b) I have lost a ten-rupee note.
(c) I do not like these kinds of games. (d) I do not like this kind of games.
**Answer options :**
(1) Both (a) and (c) (2) Both (b) and (d) (3) Only (b) (4) Only (d)

37. Complete the sentence choosing the **correct** alternative.
If you studied hard you ________ good marks.
(1) will get (2) would get (3) would have got (4) will have got

38. Which of the following is/are **correct** ?
(a) Manan is older than Ria. (b) What is the latest score ?
(c) I gave him the few books I had. (d) I do not like this kind of novels.
**Answer options :**
(1) Only (b) (2) All the above
(3) None of the above (4) Both (a) and (c)

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

**39.** (a) Neither pride nor prejudice affect him.

(b) Each of these qualities are to be found in him.

Identify the **incorrect** sentence/s.

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

---

**40.** Identify the **correct** verb form.

Has the bell ________ ?

(1) ring (2) ringed (3) rung (4) rings

---

**41.** Which of the following sentences is/are **incorrect** ?

(a) I am feeling more better today.

(b) I am not feeling much well today.

(c) I am not feeling very well today.

**Answer options :**

(1) (a) only (2) (a) and (b) only (3) (b) and (c) only (4) (a), (b) and (c)

---

**42.** Choose the **correct** sentence/s.

(a) I feel tired.

(b) I am feeling hungry.

(c) We are leaving for the continent on Friday.

**Answer options :**

(1) (b) only (2) (a) and (b) only

(3) (b) and (c) only (4) (a), (b) and (c)

---

**43.** Which of the following is/are **correct** ?

(a) He filled the pot with water.

(b) He informed me of his programme.

(c) The tree was laden with fruit.

(d) What sort of man is he ?

**Answer options :**

(1) All the above (2) Only (b)

(3) None of the above (4) Both (b) and (d)

---

44. (a) I note in my diary whenever I take extra milk from the dairy.

(b) I note in my dairy whenever I take extra milk from the dairy.

Identify the **correct** sentence.

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

---

45. Tell me where you live ?

Select the sentence in which **correct** word is used for the underlined clause.

(a) Tell me your living. (b) Tell me your address.

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

---

**Read the following passage carefully and answer the questions no. 46 to 50 given below it.**

Indian conversation today is rubbish. It is all about cricket, bollywood and political gossip. We need to change that conversation. We need to really take the lead forward to talk about Indian values, Indian customs and indigenous development. A nation of 1.3 billion can't be doing nothing. There are lots of good people in this country doing lots of good work. They don't get any recognition. It is time to change the conversation in this country and young can do that and you need to take the lead.

I get disappointed when the young in India don't demand change. You are the constituency who should be demanding change. But you are not demanding change! You put up with the way things are.

So, when this public information infrastructure is built, in may be two or three years at the cost of about 1,00,000 crores - education will change completely and lot of education institutions don't want to recognize that. We really don't need teachers to deliver content and create content. Content is already created by best of the best in the world. It is available on the net. Today we need teachers to be mentors. But none of our teachers are trained to be mentors.

Similarly, the delivery of health services, delivery of government services - all of this is going to change drastically in a very short period of time and you need to be the agent of change. You need to innovate, you need to think differently, recognizing that information brings about openness, accessibility, connectivity, networking, democratization, decentralization and as a result, social transformation.

---

46. The above extract is addressed to ________.

Select the **correct** alternative to complete the sentence.

(1) Politicians (2) Young graduates

(3) Teachers and professionals (4) Educationists

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

47. You are the constituency who should be demanding change.

Identify the **correct** meaning of the underlined.

(1) potential supporters (2) body of voters

(3) the district itself (4) area represented by a member of parliament

---

48. According to the passage Indian conversation should be about _________.

(a) Cricket, bollywood and political gossip.

(b) Indian customs, values and progress.

(c) Educational institutions and services.

(d) Competent and dutiful people and their contribution to the nation.

Choose the **correct** alternative/s.

(1) Only (a) and (c) (2) Only (b) and (d)

(3) Only (c) (4) Only (d)

---

49. She is talking thoughtful.

Select the **correct** antonym to the underlined.

(1) gossip (2) disappointing (3) rubbish (4) change

---

50. (a) Today, students don't need teachers at all.

(b) The teachers should create content and present it to the students.

(c) The teacher should just work as an advisor and consultant for the students.

Identify the **correct** sentence.

(1) Only (a) and (b) (2) Only (b) and (c)

(3) Only (b) (4) Only (c)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

51. वार्षिक योजनेच्या आकारमानाच्या किती % निधी अनुक्रमे अनुसुचीत जाती उपयोजनेसाठी व अनुसुचीत जमाती उपयोजनेसाठी उपलब्ध करुन दिला जातो ?

(1) 7 व 13% (2) 9.4 व 11.8% (3) 13 व 7% (4) 11.8 व 9.4%

---

52. 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान' या मोहिमेच्या घटकांमध्ये खालीलपैकी कोणत्या घटकाचा समावेश आहे ?

(1) वैयक्तिक शौचालय (2) सामुदायिक शौचालय

(3) घनकचरा व्यवस्थापन (4) वरील सर्व

---

53. 'जलयुक्त शिवार अभियान' या योजनेच्या उद्देशामध्ये खालीलपैकी कशाचा समावेश आहे ?

(1) पावसाचे पाणी गावाच्या शिवारातच अडविणे

(2) भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ

(3) शेतीसाठी संरक्षित पाणी

(4) वरीलपैकी सर्व

---

54. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम कधी पासून लागू करण्यात आला ?

(1) 2014 (2) 2015 (3) 2016 (4) 2013

---

55. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेत अपघातामुळे एक डोळा अथवा एक अवयव निकामी झाल्यास किती नुकसान भरपाई अनुज्ञेय आहे ?

(1) ₹ 1,00,000 (2) ₹ 10,000 (3) ₹ 50,000 (4) ₹ 5,00,000

---

56. 'महाराजस्व अभियान' हा कार्यक्रम राज्यात कधीपासून राबविण्यात आला ?

(1) 1 ऑगस्ट, 2015 (2) 1 ऑगस्ट, 2016

(3) 15 ऑगस्ट, 2016 (4) 2 ऑक्टोबर, 2016

---

57. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत वैयक्तिक शौचालयाच्या बांधकामासाठी प्रती शौचालय प्रोत्साहनात्पर रक्कम किती ठरविण्यात आली आहे ?

(1) ₹ 10,000 (2) ₹ 12,000 (3) ₹ 8,000 (4) ₹ 15,000

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

58. आदिवासी भागात सावकार व व्यापाऱ्यांकडून होणारी आदिवासी लोकांची पिळवणुक थांबविण्यासाठी "खावटी कर्ज योजना" कधीपासून सुरु करण्यात आली ?

(1) 1978 (2) 1976 (3) 1979 (4) 1977

---

59. 'हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे निराधार स्वावलंबन योजना' संदर्भात खालीलपैकी कोणती विधाने योग्य आहेत ?

(अ) आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवा लाभार्थी आहेत.

(ब) लाभार्थींना ऑटोरिक्षा परवाना वितरित केला जाईल.

(क) ऑटोरिक्षा खरेदीसाठी बँका व तत्सम संस्थांकडून 100% कर्जपुरवठा

(ड) ऑटोरिक्षा परवाना साठी ऑटोरिक्षा लायसन्स व बॅज असणे बंधनकारक

**पर्यायी उत्तरे :**

(1) सर्व (2) केवळ (अ), (ब) व (क)

(3) केवळ (ब), (क) व (ड) (4) केवळ (अ), (क) व (ड)

---

60. 'केंद्रिय अर्थसंकल्प (न्यूक्लिअस बजेट) योजना' हि योजना कोणत्या विभागाची आहे ?

(1) वित्त विभाग (2) नियोजन विभाग

(3) आदिवासी विकास विभाग (4) सामान्य प्रशासन विभाग

---

61. पावसाळ्याच्या कालावधीत सर्व आरोग्य विषयक/पोषण विषयक योजना राज्याच्या आदिवासी क्षेत्रातील सर्व जिल्ह्यात राबविण्याकरीता मेळघाट पॅटर्न बाबतचा निर्णय शासनाने कधी घेतला ?

(1) सन 2001 - 2002 (2) सन 2002 - 2003 (3) सन 2004 - 2005 (4) सन 2003 - 2004

---

62. वनावर जळाऊ, लाकडासाठी अवलंबुन असलेल्या एका कुटुंबाला प्रती वर्षी सर्वसाधारणपणे किती टन जळाऊ लाकडाची आवश्यकता असते ?

(1) 2 टन (2) 1 टन (3) 1.5 टन (4) 3 टन

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

63. प्रस्तावित नागपुर – मुंबई जलदगती महामार्गासंदर्भातील खालीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?

(अ) या महामार्गाचे नाव नागपुर – मुंबई समृद्धी जलदगती महामार्ग

(ब) महामार्ग एकूण 6 लेन चा असेल

(क) महामार्गावर टाऊनशिप करण्यात येणार

(ड) हा महामार्ग राज्यातील 78 तालुक्यांतून जाणार आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (अ), (क) व (ड) (2) केवळ (अ), (ब), व (क)

(3) सर्व (4) एकही नाही

---

64. मराठी भाषा गौरवदिन कोणत्या दिवशी असतो ?

(1) 27 फेब्रुवारी (2) 28 फेब्रुवारी (3) 27 सप्टेंबर (4) 1 डिसेंबर

---

65. "मागेल त्याला शेततळे" या योजनेबाबत खालीलपैकी कोणती विधाने योग्य आहेत ?

(अ) लाभार्थीकडे 2 हेक्टरपेक्षा जास्त जमीन असू नये.

(ब) देय अनुदानास कमाल मर्यादा लागू नाही.

(क) शेततळ्यासाठी लागणाऱ्या जागेचा मोबदला ₹ 1,000 प्रती चौरस मीटर प्रमाणे दिला जाईल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (अ) व (ब) (3) (अ), (ब) व (क) (4) कोणतेही नाही

---

66. इंदिरा आवास घरकुल योजनेबाबत खालीलपैकी **अचुक** पर्याय कोणता ?

(अ) केंद्र राज्य हिस्सा 80 : 20

(ब) अपंगासाठी 3% आरक्षण

(क) अल्पसंख्याकांसाठी 15% आरक्षण

(ड) जिल्हा निहाय घरकुलांचे उद्दीष्ट राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत निश्चित करण्यात येते.

**पर्यायि उत्तरे :**

(1) फक्त (अ) व (ब) बरोबर (2) फक्त (ब), (क) व (ड) बरोबर

(3) फक्त (ब) व (क) बरोबर (4) वरीलपैकी सर्व बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा** /*SPACE FOR ROUGH WORK*

67. किल्ल्यांचा पर्यटनदृष्ट्या विकास या पहील्या किल्ले मालिकेत शिवनेरी, तोरणा, सिंहगड, लोहगड या बरोबरच खालीलपैकी कोणत्या किल्ल्याचा समावेश आहे ?

(1) प्रतापगड (2) राजगड (3) राजमाची (4) पुरंदर

---

68. मान्यताप्राप्त व्यावसायिक व उच्च शिक्षण अभ्यासक्रमात शिकणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकातील विद्यार्थ्यांना "राज्य शिक्षण शुल्क" योजनेअंतर्गत लाभ देण्यासाठी कुटूंबाची वार्षिक आर्थिक मर्यादा किती आहे ?

(1) ₹ 6.50 लक्ष (2) ₹ 4.00 लक्ष (3) ₹ 4.50 लक्ष (4) ₹ 6.00 लक्ष

---

69. पश्चिम भारतातील पहिला 'हागणदारीमुक्त जिल्हा' म्हणून घोषित करण्यात आलेला जिल्हा कोणता ?

(1) अहमदाबाद (2) पुणे (3) गडचिरोली (4) सिंधुदुर्ग

---

70. 'सावित्रीबाई फुले कल्याण योजना' संदर्भात खालीलपैकी कोणती विधाने बरोबर/योग्य आहेत ?

(अ) दारिद्र्यरेषेखालील सर्व जोडप्यांना लाभ

(ब) मुलगा नसलेल्या व एक किंवा दोन मुलीनंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेल्या दारिद्र्यरेषेखालील जोडप्यास लाभ.

(क) व्यक्तिस ₹ 2,000 व प्रत्येक मुलीच्या नावे ₹ 4,000 चे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र स्वरूपात आर्थिक मदत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (ब) (2) केवळ (अ) व (ब) (3) सर्व (4) एकही नाही

---

71. सामुहिक प्रोत्साहन योजना 2013 या योजनेचा कालावधी कोणता ?

(1) दि. 1 एप्रिल, 2013 ते 31 मार्च, 2014 (2) दि. 1 एप्रिल, 2013 ते 31 मार्च, 2018

(3) दि. 31 मार्च, 2013 ते 31 मार्च, 2014 (4) दि. 31 मार्च, 2013 ते 31 मार्च, 2018

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

72. 'डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना' संदर्भात खालीलपैकी कोणते विधान/विधाने योग्य आहेत ?

(अ) सहकारी कृषी पतसंस्थेकडून पीक कर्ज घेणाऱ्या व त्याची प्रतीवर्षी 30 जून पर्यंत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना व्याज सवलत.

(ब) राष्ट्रीयकृत बँका, ग्रामीण बँका, व खाजगी बँकाकडून पीक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांनाही व्याज सवलत.

(क) थकित कर्ज तसेच मध्यम व दिर्घ मुहतीच्या कर्जासाठी व्याज सवलत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) सर्व (2) एकही नाही

(3) केवळ (अ) व (ब) (4) केवळ (ब) व (क)

---

73. देशविदेशातील विविध उद्योगसमुहांना राज्यातील उद्योगांची ओळख व्हावी यासाठी 'मेक इन इंडिया' वीक चे आयोजन मुंबई शहरात केंव्हा करण्यात आले ?

(1) 1 ते 6 जानेवारी, 2016 (2) 13 ते 18 फेब्रुवारी, 2016

(3) 23 ते 30 मार्च, 2016 (4) 1 ते 6 एप्रिल, 2016

---

74. राष्ट्रीय कृषी विकास योजना या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत राज्यस्तरीय प्रकल्प छाननी समितीचे (SLPSC) अध्यक्ष कोण असतात ?

(1) मुख्य सचिव (2) सचिव, कृषि (3) केंद्रिय कृषि सचिव (4) वित्त सचिव

---

75. 'महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजनेच्या' लाभार्थीमध्ये खालीलपैकी कोणाचा समावेश होत नाही ?

(1) अधिस्विकृतीधारक पत्रकार व त्यांच्यावर अवलंबून असणारी कुटुंबे

(2) शासकिय आश्रमशाळेतील विद्यार्थी

(3) शासकिय, निमशासकीय कर्मचारी

(4) शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील शुभ्रशिक्षापत्रिकाधारक शेतकरी कुटुंबे

---

76. 'कामगार हितवर्धक' या संस्थेचे संस्थापक कोंण होते ?

(1) ना.म. जोशी (2) बी.पी. वाडिया (3) लाला लजपतराय (4) सी.के. बोले

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

77. 'एक हिंदू' हे टोपण नाव घेऊन जातिभेद विवेकसार हा ग्रंथ कोणी लिहीला ?

(1) महात्मा फुले (2) बाबा पद्मनजी

(3) तुकाराम तात्या पडवळ (4) ज्ञानगिरी बाबा

78. बंगालची फाळणी करणारा लॉर्ड कर्झन एका अनावृत्त पत्रात ब्रिटिश राजवटीत शेतकऱ्यांना आर्थिक हलाखी येण्याची कारणमिमांसा करतांना काय लिहीतो ?

(अ) भारतातील 'वाढती लोकसंख्या आणि प्रतिकुल हवामान'

(ब) सरकारने ठरविलेला 'अवास्तव महसूल'

(क) शेतकऱ्याचा आळशीपणा व स्थिति प्रियता'

(ड) जमिनदाराचे अधिकार व कालव्यांकडे दुर्लक्ष

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) आणि (क) बरोबर (2) (ब) आणि (ड) बरोबर

(3) (क) आणि (ब) बरोबर (4) (ड) आणि (अ) बरोबर

79. 'इल्बर्ट बिल' प्रकरण कोणत्या गव्हर्नर जनरलच्या कारकिर्दीत उद्‌भवले ?

(1) लॉर्ड रिपन (2) लॉर्ड लिटन (3) लॉर्ड विल्यम बेंटिंग (4) लॉर्ड डलहौसी

80. बंगालच्या फाळणीचा प्रमुख उद्देश __________ होता.

(1) बंगाल प्रांताचा कारभार सुधारणे (2) आसामची उन्नती साधणे

(3) कलकत्याचा प्रभाव कमी करणे (4) भेद नीतीद्वारे राष्ट्रीय चळवळीवर आघात करणे

81. महाराष्ट्राच्या सरहदी :

| | **दिशा** | | **राज्ये** |
|---|---|---|---|
| (अ) | उत्तर | (i) | छत्तीसगड |
| (ब) | दक्षिण | (ii) | आंध्र प्रदेश |
| (क) | पूर्व | (iii) | मध्य प्रदेश |
| (ड) | आग्नेय | (iv) | कर्नाटक, गोवा |
| (इ) | वायव्य | (v) | गुजरात |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) | (इ) |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (iv) | (iii) | (ii) | (v) |
| (2) | (iii) | (ii) | (i) | (v) | (iv) |
| (3) | (iii) | (iv) | (i) | (ii) | (v) |
| (4) | (i) | (ii) | (iii) | (iv) | (v) |

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

82. एक चौरस सेंटीमीटर जागेवर __________ लाख डाईन्समुळे पडणारा हवेचा दाब म्हणजे एक बार होय.

(1) 01 (2) 05 (3) 10 (4) 11

83. जाफराबादी या जातीच्या म्हशीचा प्रकार कोणत्या राज्यात विकसित करण्यात आला ?

(1) बिहार (2) गुजरात (3) उत्तरप्रदेश (4) हरियाणा

84. खालील विधाने पहा :

(अ) प्राथमिक व्यवसाय हे नैसर्गिक संसाधानावर आवलंबुन आहेत.

(ब) प्राथमिक व्यवसायांवर इतर व्यवसाय आधारले असतात म्हणून हे व्यवसाय पायाभूत आहेत.

(क) प्राथमिक व्यवसायात गुंतलेल्या लोकांना श्रमाचा मोबदला कमी मिळतो.

(ड) विकसनशील प्रदेशात प्राथमिक व्यवसायात गुंतलेल्या लोकांचे प्रमाण कमी असते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) आणि (क) बरोबर आहेत (2) (अ), (ब) आणि (ड) बरोबर आहेत

(3) (अ), (क) आणि (ड) बरोबर आहेत (4) (अ), (ब), (क) आणि (ड) बरोबर आहेत

85. खालीलपैकी कोणत्या जलसिंचन प्रकल्पाच्या जलाशयास यशवंत सागर असे नाव देण्यात आले आहे ?

(1) जायकवाडी (2) उजनी (3) कोयना (4) भंडारदरा

86. खालील विधाने विचारात घ्या :

(अ) नवी लोकसभा अस्तित्वात आल्यानंतर बोलाविल्या जाणाऱ्या दोन्ही सभागृहाच्या बैठकीचे अध्यक्षस्थान राष्ट्रपतींकडे असते.

(ब) एखाद्या विधेयकाबाबत मतभेद झाल्यास बोलाविल्या गेलेल्या संसदेच्या संयुक्त अधिवेशनाचे अध्यक्षस्थान लोकसभेचे सभापती भूषवतात.

(क) संसदेच्या संयुक्त अधिवेशन प्रसंगी लोकसभेचा सभापती बसल्यास राज्यसभेचा उपाध्यक्ष बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवतो.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) (अ) आणि (ब) (2) फक्त (ब)

(3) (ब) आणि (क) (4) (अ) आणि (क)

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

87. खालील विधाने विचारात घ्या :

(अ) भारताच्या महान्यायवादींची नियुक्ती राष्ट्रपतींकडून केली जाते.

(ब) महान्यायवादी पदाचा कार्यकाळ तीन वर्षे आहे.

(क) संसद सदस्यांना उपलब्ध असणारे सर्व विशेषाधिकार महान्यायवादींना उपलब्ध असतात.

(ड) भारताच्या सर्व न्यायालयात उपस्थित राहण्याचा अधिकार महान्यायवादींना आहे.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) (अ), (ब) आणि (क) (2) (ब), (क) आणि (ड)

(3) (अ), (क) आणि (ड) (4) (अ), (ब) आणि (ड)

88. भारतीय राज्यव्यवस्थेचा कोणता घटक मूलत: एकात्म स्वरूपाचा आहे ?

(1) न्यायमंडळ (2) लोकसभा (3) कार्यकारी मंडळ (4) राज्यसभा

89. भारतीय संविधानाच्या मूलभूत संरचनेत कोणत्या घटकाचा अंतर्भाव प्राय: होत नाही ?

(1) लोकशाही (2) कायद्याचे अधिराज्य (3) धर्मनिरपेक्षता (4) मूलभूत कर्तव्ये

90. रिओ दी जानेरी येथील 2016 ची पॅरॉलिंपीक स्पर्धा खालील भारतीय खेळांडूनी गाजविली.

(अ) मरियप्पन थंगवेलू (मरियप्पन) (ब) दिपा मलिक

(क) ब्रॅडली विगिन्जं (ड) यापैकी एकही नाही

वरीलपैकी कोणते विधान **बरोबर** आहे ?

(1) (अ) फक्त (2) (अ) आणि (ब) फक्त

(3) (ब) आणि (क) फक्त (4) (अ), (ब) आणि (क) फक्त

91. अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना आदीवासी उपाययोजने अंतर्गत 5% निधी थेट अनुदान देणारे __________ हे देशातील पहिले राज्य होय.

(1) आंध्रप्रदेश (2) महाराष्ट्र (3) बिहार (4) यापैकी एकही नाही

92. यु.आर.राव यांच्यासंदर्भात खालील विधाने विचारात घ्या :

(अ) ते इस्रोचे माजी अध्यक्ष आणि अवकाश शास्त्रज्ञ म्हणून ओळखले जातात.

(ब) त्यांच्या मार्गदर्शनाखाली इस्रोने 18 पेक्षा जास्त उपग्रहांची निर्मिती केली.

(क) 2016 मध्ये इंटरनॅशनल ॲस्ट्रॉनॉटिक्स फेडरेशनने त्यांना समाविष्ट करून घेतले.

(ड) 1976 मध्ये त्यांना भारत सरकारने पद्मभूषण पुरस्काराने गौरविले होते.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) (अ), (ब) आणि (क)    (2) (ब), (क) आणि (ड)

(3) (अ), (क) आणि (ड)    (4) (अ), (ब) आणि (ड)

---

93. खालील विधाने विचारात घ्या :

(अ) पंतप्रधानांची नियुक्ती राष्ट्रपतींकडून केली जाते.

(ब) राष्ट्रपती पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसार मंत्र्यांची नियुक्ती करतात.

(क) प्रत्यक्षात (In practice) राष्ट्रपतींची मर्जी असे पर्यंत मंत्री आपल्या पदावर राहू शकतात.

(ड) मंत्रीमंडल सामूहिक रित्या लोकसभेला जबाबदार असते.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) (अ) आणि (क)    (2) (अ), (ब) आणि (ड)

(3) (ब) आणि (क)    (4) (क) आणि (ड)

---

94. खालीलपैकी कोणते विधान/विधाने **बरोबर** आहे/आहेत ?

(अ) वस्तु व सेवा कर (GST) विधेयक-2016 हे 101 वे घटना दुरुस्ती अधिनियम म्हणून घोषित झाले आहे.

(ब) वस्तु व सेवा कर परिषद ही अनुच्छेद 269 A अन्वये निर्माण झाली आहे.

(क) वस्तु व सेवा कर परिषदेच्या प्रमुख पदी पंतप्रधान आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ)    (2) (अ), (ब)    (3) (क)    (4) वरील सर्व

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

95. अलीकडे निवर्तलेले ख्यातनाम चित्रकार सैयद हैदर रझा यांच्या शैलीचे ठळक वैशिष्ट्य कोणते ?

(1) भूमितीय आकृतीबंध
(2) इस्लामी रूपचिन्हे
(3) व्यक्तिचित्रांकन
(4) अलंकरण

---

96. माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम 7(8) प्रमाणे ज्या वेळी शासकीय अधिकाऱ्याकडून माहिती नाकारली जाते, त्यावेळी त्याने माहिती मागणाऱ्या अर्जदाराशी पुढील बाबतीत संपर्क साधला पाहिजे :

(अ) माहिती नाकारण्यामागची कारणे.
(ब) सदर आदेशाविरुद्ध अर्जदारास अपील करण्याची असलेली मूदत.
(क) अपिलीय प्राधिकाऱ्याविषयी सविस्तर माहिती.
(ड) कार्यालयाची सविस्तर माहिती.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) आणि (क)
(2) (ब), (क) आणि (ड)
(3) (अ), (क) आणि (ड)
(4) वरील सर्व

---

97. माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतूदीनुसार "अभिलेख" म्हणजे __________ .

(1) कोणताही दस्तऐवज, हस्तलिखित व फाईल
(2) एखाद्या दस्ताऐवजाची कोणतीही मायक्रोफिल्म, मायक्रोफिच आणि प्रतिरूप प्रत
(3) अशा मायक्रोफिल्ममध्ये संग्रहीत केलेल्या प्रतिमेची किंवा प्रतिमांची कोणतीही नक्कल
(4) वरील सर्वच

---

98. सार्वजनिक प्राधिकरण म्हणजे :

(अ) भारतीय राज्यघटनेने निर्माण केलेले प्राधिकरण.
(ब) संसदेच्या किंवा विधानसभेच्या कायद्यान्वये बनलेले प्राधिकरण.
(क) केंद्र वा राज्य सरकारांनी काढलेल्या अधिसुचनेद्वारे स्थापन करण्यात आलेले प्राधिकरण.
(ड) सर्वोच्च न्यायालयाने निर्माण केलेले प्राधिकरण.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) आणि (क)
(2) (ब), (ड) आणि (क)
(3) (अ), (ब) आणि (क)
(4) (ब) आणि (ड)

---

99. माहिती अधिकार अधिनियम 2005 हा कायदा अंमलात आला असल्याने __________ आता गैरलागू झाला/झाले आहे.

(अ) ऑफिशियल सिक्रेट ॲक्ट 1923
(ब) भारतीय राज्यघटनेतील परिशिष्ट 14
(क) द कमिशन ऑफ इन्क्वायरी ॲक्ट 1952
(ड) द हिंदु सक्सेशन ॲक्ट 1956

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) आणि (क)
(2) फक्त (अ)
(3) वरील सर्व
(4) (ब), (क) आणि (ड)

---

100. राज्य माहिती आयोगाच्या कामकाजाचे सर्वसाधारण अधीक्षण, संचालन व व्यवस्थापन हे __________ कडे विहीत असेल.

(1) राज्य मुख्य माहिती आयुक्त
(2) राज्य माहिती आयोग
(3) राज्यपाल
(4) मुख्यमंत्री

---

- o 0 o -

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

## सूचना — ( पृष्ठ 1 वरून पुढे.... )

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्र. क्र. 201. "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्प्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल, यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

SEAL